महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/मान्यता/२०२२/ 1640
दिनांक : ०५/०४/२०२२ 0 5 APR 2022

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत..**

**संदर्भ** :- १. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेली जाहिर सुचना क्र Advt.No.Approval Bureau/२०२२ दि.२९.०३.२०२२

२. संचालनालयाचे प्रसिध्द केलेली जाहीर सुचना क्र १०/एनजीपी/मान्यता/जाहिर सुचना/२०२२-२३/३१५ दि.०४.०४.२०२२

३. संचालनालयाचे पत्र क्र.१०/एनजीपी/मान्यता प्रक्रिया/२०२२-२३/३१८ दि. ०४.०४.२०२२

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रियेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहिर सुचनेव्दारे (Public Notice For Approval Process-2022-23) AICTE ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०२२-२३ मधील मार्गदर्शक सुचनांच्या आधारे ऑनलाईन पध्दतीने अर्ज दि. २९.०३.२०२२ ते दि. २२.०४.२०२२ पर्यंत व विद्यमान संस्थांसाठी दंड भरुन मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दि. २९.०४.२०२२ हा निर्धारीत करण्यात आलेला आहे. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरिता दि. ०७.४.२०२२ पासून http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी विदयमान संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड व्दारे लॉगीन करुन दि. २३.०४.२०२२ पर्यंत व AICTE यांचेकडे दंड भरुन मान्यतेस विस्ताराबाबत सादर केलेल्या अर्जाची माहिती दि. ३०.४.२०२२ पर्यंत भरुन, भरलेल्या माहितीची निश्चिती (Confirm) करण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विदयापीठांशी/मंडळाशी संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका इत्यादी स्तरावर अभियांत्रिकी /हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी/ मॅनेजमेंट/ एम.सी.ए. या व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था ( APH २०२२-२३ मधील तरतूदीनुसार) सुरु करणाऱ्या संस्थांनी संचालनालयाच्या संकेतस्थळावर नवीन नोंदणी करुन त्याअनुषंगाने आवश्यक ती माहिती भरुन, भरलेल्या माहितीची निश्चिती (Confirm) करावी.

१. विदयमान व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नव्याने सुरु होणाऱ्या संस्थांनी नवीन ( APH २०२२-२३ मधील तरतूदीनुसार) दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या नोंदणी शुल्क या कार्यालयाकडे अदा करण्यात यावे. सदर नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत या कार्यालयाकडे प्रस्तावासोबत सादर करावी.

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व वास्तुकला परिषद , नवी दिल्ली यांना केलेल्या खालील प्रकारच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे.

- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विदयापीठ/ मंडळ संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नवीन तांत्रिक शिक्षण संस्था ( APH २०२२-२३ मधील तरतूदीनुसार) सुरु करणे.
- एमसीए/एमबीए अभ्यासक्रम संचलित करणाऱ्या बिगर तांत्रिक संस्थानी नवीन तांत्रिक संस्था म्हणून अर्ज करणे.
- विदयमान संस्था बंद करुन तेथे नवीन व्यावसिक अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे.
- विदयमान संस्थेच्या साईट/लोकेशन मध्ये बदल करणे.
- महिला संस्थेचे को-एज्युकेशनमध्ये परिवर्तन व त्याउलट
- पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.
- विदयमान संस्थेत नवीन विदयशाखा (Programme)/ स्तर (Level)सुरु करणे.
- विदयमान संस्था बंद करणे.
- ट्रस्ट/सोसायटी/कंपनीच्या नावात/पत्यात बदल करणे

वरील अर्जाची प्रत (Hard Copy) संबंधित संस्थांनी AICTE च्या ऑनलॉईन पध्दतीने सादर केलेल्या दिनांकाच्य दुसऱ्या किंवा दि. २३.०४.२०२२ यापैकी जे अगोदर असेल त्या दिनांकास या कार्यालयाकडे सादर करावे. याबाबत शासनाने विहित केलेले नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी तसेच वरील प्रस्ताव या कार्यालयास सादर करतांना संबंधित प्रस्तावावर ठळक अक्षरात "----------- " प्रस्तावाचा विषय नमूद करावा.

३. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भीय जाहिर सुचनेत नमुद केलेल्या अर्जापैकी परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या अर्जाव्यतिरिक्त उर्वरित अर्जाची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध करुन दिलेल्या पोर्टलवर भरणे अनिवार्य राहील. सबब सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात येते की, याबाबतची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावरील पोर्टलवर भरुन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषेदस सादर केलेल्या प्रस्तावाची हार्ड कॉपी व नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीच्या प्रतीसह या विभागीय कार्यालयाकडे जमा करण्यात यावी.

४. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीताच्या मान्यतेसाठी सर्व संस्थांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना ऑनलॉईन सादर केलेल्या अर्जाची माहिती संचालनालयाने http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळवर उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवर भरणे अनिवार्य राहील अन्यथा अशा संस्थांच्या अर्जाच्या अनुषगाने पुढील कार्यवाही संचालनालय स्तरावरुन करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

## जाहिर सूचना

क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/जाहीर सूचना/२०२२-२३/ ३१५ दिनांक : - 4 APR 2022

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE ) यांनी सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे[PUBLIC NOTICE FOR APPROVAL PROCESS २०२२-२३] एआयसीटीई ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०२२-२३ मधील मार्गदर्शक सूचनांच्या आधारे ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक **२९.०३.२०२२ ते दि. २२.०४.२०२२** पर्यंत व विद्यमान संस्थांसाठी दंड भरून मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक २९.०४.२०२२ हा निर्धारीत केलेला आहे. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जांच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता दि. ०७.०४.२०२२ पासून http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी विद्यमान संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि २३.०४.२०२२ पर्यंत व AICTE यांचेकडे दंड भरुन मान्यतेस विस्तारावावत सादर केलेल्या अर्जाची माहिती दि. ३०.०४.२०२२ पर्यंत भरून, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विद्यापीठांशी / मंडळाशी संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका इ. स्तरावर अभियांत्रिकी / हॉटेल मॅनेजमेंट ॲड कॅटरींग टेक्नॉलॉजी/ मॅनेजमेंट / एम.सी.ए. या व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था APH २०२२-२३ मधील तरतूदीनुसार) सुरू करणाऱ्या संस्थांनी संचालनालयाच्या संकेतस्थळावर नवीन नोंदणी करुन त्याअनुषंगाने आवश्यक ती माहिती भरून, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करावी.

१. विद्यमान व शैक्षणिक वर्ष २०२२.२३ पासून नव्याने सुरू होणाऱ्या संस्थांनी (APH २०२२-२३ मधील तरतूदीनुसार) दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे अदा करण्यात यावे. सदर नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये यांचेकडे प्रस्तावासोवत सादर करावी.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांना केलेल्या खालील प्रकारच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे.

   i. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विद्यापीठ / मंडळ संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था (APH २०२२-२३ मधील तरतूदीनुसार) सुरू करणे.
   ii. एमसीए / एमवीए अभ्यासक्रम संचलित करणाऱ्या बिगर तांत्रिक संस्थानी नवीन तांत्रिक संस्था म्हणून अर्ज करणे
   iii. विद्यमान संस्था बंद करून तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरू करणे
   iv. विद्यमान संस्थेच्या साईट / लोकेशन मध्ये बदल करणे.
   v. महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट
   vi. पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.
   vii. विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) / स्तर (Level) सुरू करणे.
   viii. विद्यमान संस्था बंद करणे
   ix. ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात/ पत्त्यात बदल करणे

वरील अर्जांची प्रत (Hard Copy) संबधित संस्थांनी AICTE च्या ऑन लाईन पध्दतीने सादर केलेल्या दिनांकाच्या दुसऱ्या किंवा दिनांक २३.०४.२०२२ यापैकी जे अगोदर असेल त्या दिनांकास सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करावा. याबाबत विभागीय कार्यालयाकडे शासनाने विहित केलेले नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच वरील प्रस्ताव सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय यांना सादर करतांना संबंधित प्रस्तावावर ठळक अक्षरात "----------------------" (प्रस्तावाचा विषय) नमूद करावा.

३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भीय जाहिर सूचनेत नमूद केलेल्या अर्जापैकी परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या अर्जाव्यतिरीक्त उर्वरीत अर्जांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध करून दिलेल्या पोर्टलवर भरणे अनिवार्य राहील. सबब सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात येते की, याबाबतची माहिती संचालनालयाचे संकेतस्थळावरील पोर्टलवर भरुन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस सादर केलेल्या प्रस्तावाची हार्ड कॉपी व नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीच्या प्रतीसह (मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह), सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय यांचेकडे जमा करण्यात यावी.

४. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीताच्या मान्यतेसाठी सर्व संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना ऑन लाईन सादर केलेल्या अर्जाची माहिती या संचालनालयाने http://www:dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी उपलब्ध करून दिलेल्या लिंकवर भरणे अनिवार्य राहील अन्यथा अशा संस्थाच्या अर्जाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही संचालनालय स्तरावरुन करण्यात येणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी. तसेच याबाबत संबंधित संस्थांना काही अडचणी आल्यास त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी दि. २२.०२.२०१८ अन्वये शासनाने निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क संबंधित संस्थाकडून घेण्यात यावे. तसेच परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या प्रस्तावाबाबत AICTE ने APH २०२२-२३ मध्ये निर्धारीत केलेले/ फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया / वास्तुकला परिषद यांच्या मानकांनुसार प्रत्यक्ष तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल संबंधित संस्थानी परिषदेस सादर केलेल्या प्रस्तावाच्या दिनांकापासून २ दिवसांचे आत खास दुतामार्फत या संचालनालयास सादर करावेत.

२. प्रणाली व्यवस्थापक, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई, यांनी संकेतस्थळ अद्ययावत करुन घेऊन संकेतस्थळावरील प्राप्त माहितीचे विश्लेषण करावे तसेच गोषवारा उपलब्ध करुन देण्यात यावा.

३. सर्व संबंधित संस्था (संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत)

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता प्रक्रिया/२०२२-२३/३१८ दिनांक :०४.०४.२०२२

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत........

संदर्भ :-१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेली जाहिर **सूचना** क्रमांक: Advt. No: Approval Bureau/**२०२२, दिनांक : २९.३.२०२२**

२) या संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहीर सूचना क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/जाहिर सूचना/२०२२-२३/३१५ दिनांक : ०४.४.२०२२.

३) या संचालनालयाने वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली जाहीर सूचना क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/२०२२-२३/३१७ दिनांक : .०४. ०४.२०२२.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [Advt. No: Approval Bureau/2022] एआयसीटीई ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०२२-२३ मधील मार्गदर्शक सूचनांच्या आधारे ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक **२९.०३.२०२२ ते** दि. **२२.०४.२०२२** पर्यंत व विद्यमान संस्थांसाठी दंड भरुन मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक २९.०४.२०२२ हा निर्धारीत केला आहे. त्यास अनुसरुन संचालनालय स्तरावरुन संदर्भ क्रमांक २ व ३ च्या जाहिर सूचना प्रसिध्द केल्या असून त्या आपणांस अग्रेषित केलेल्या आहेत. याबाबत आपल्या स्तरावरुन विनाविलंब खालील कार्यवाही करण्यात यावी.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेस अनुसरून या संचालनालयाने प्रसिध्द केलेल्या संदर्भ क्रमांक २ व ३ च्या अधिसूचनेतील निर्देश आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संस्थांना आपले स्तरावरुन देण्यात यावेत.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या जाहिरातीस अनुसरून विना अनुदान तत्वावर पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था / महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये नोंदणी शुल्क निर्धारीत केलेले आहे. त्यानुसार आपल्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांच्या अनुषंगाने नोंदणी शुल्क संस्थेकडून जमा करुन घेण्यात यावे. ज्या संस्था नोंदणी / तपासणी शुल्क भरणार नाहीत, अशा संस्थांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही व त्यास संबंधित संस्था / ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहील, याची आपल्या स्तरावरुन संबंधितांना जाणीव करुन देण्यात यावी.

३. सदर्भ क्रमांक २ च्या जाहिर सूचनेतील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद अर्ज ज्या संस्थांनी AICTE कडे केले असतील अशा संस्थांना सदर प्रस्तावाच्या प्रतीसह आपल्या कार्यालयास संपर्कासाठी सूचित केले आहे. याबाबत प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित संस्थेचे नोंदणी शुल्क/तपासणी शुल्क घेऊन आपल्या स्तरावर त्रिसदस्यीय तपासणी समिती नेमण्यात यावी. सदर समितीमध्ये **स्थापत्य अभियांत्रिकी किंवा उपयोजित यंत्रशास्त्र किंवा आर्किटेक्चर विभागातील विभाग प्रमुख/प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक अशा एका सदस्याचा समावेश करण्यात** यावा. सदर समितीने संबंधित शिखर परिषदांच्या मानकाप्रमाणे सक्षम समुचित प्राधिकरण (Competent

Autority) यांच्या मान्यतेचे जमीनीचे सर्व संबंधित कागदपत्रे, उदाहरणार्थ ७/१२ चा उतारा, सर्वे नं., बिगरशेती प्रमाणपत्र, लँड युज सर्टिफिकेट यांची तपासणी करावी. तसेच संबंधित सक्षम समुचित प्राधिकरणाने (Competent Autority) प्रमाणित केलेले वास्तुविशारद स्वाक्षरीत नकाशे, बांधकाम प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र, बांधकामाचे मोजमाप इत्यादी तपासावे. सर्व कागदपत्रांची पडताळणी संबंधित मूळ कागदपत्रावरुन प्रत्यक्ष करुन त्याची साक्षांकित प्रत तपासणी अहवालासोबत सादर करावी. त्याचप्रमाणे जागा, इमारत, बांधकाम, निधी, यंत्रसामुग्री व इतर सोयी-सुविधा AICTE ने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीताच्या अॅप्रुव्हल प्रोसेस हँडबुक / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया/ वास्तुकला परिषदेने निर्धारीत केलेल्या विहित मानकानुसार उपलब्ध असल्याबाबत तपासणी करण्यात यावी.

४. **अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील संस्थाना आपल्याकडे जमा करण्यास सूचित केले आहे. त्यानुसार आपल्या कार्यालयात प्राप्त प्रस्तावांची पोच देऊन सदर प्रस्ताव आपल्या स्तरावर जतन करण्यात यावेत.**

५. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदने निर्धारीत केलेल्या संबंधित प्रस्तावांबाबते शासनाचे अभिप्राय AICTE कडे पाठविण्याबाबतचा कालावधी अत्यल्प आहे. सबब आपल्या कार्यालयाकडे APH २०२२-२३ मधील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या नवीन संस्था सुरू करण्यासाठीच्या अर्जाच्या अनुषंगाने परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केल्यानूसार आपले स्तरावरुन कार्यवाही झाल्यानंतर संबंधित संस्थेचा प्रस्ताव, तपासणी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह दि. २४.०४.२०२२ पर्यंत खास दुतामार्फत या संचालनालयास निश्चितपणे उपलब्ध करुन द्यावेत. **अन्यथा AICTE कडे आपल्यामार्फत विहित कालमर्यादेत प्रस्ताव प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव शिफारशी पाठविण्यास उशीर झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील, यांची नोंद घ्यावी.**

६. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस खालील प्रस्तावांसाठी संबंधित संस्थाना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र द्यावयाचे आहे. सदर प्रस्तावांसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी अॅप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक २०२२-२३ मधील Appendix १७.३,१७.७, १६.४ व १७.१३ मध्ये आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी दिलेली आहे. यास्तव आपल्या कार्यालयाकडे येणाऱ्या खालील प्रस्तावा संदर्भातील कागदपत्रांच्या पुर्ततेच्या अनुषंगाने आपले स्तरावर उचित कार्यवाही करुन परिपुर्ण प्रस्तावच या संचालनालयास सादर करावेत.

- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विद्यापीठ / मंडळ संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था (APH २०२२-२३ मधील तरतूदीनुसार) सुरू करणे.
- एमसीए / एमबीए अभ्यासक्रम संचलित करणा-या बिगर तांत्रिक संस्थानी नवीन तांत्रिक संस्था म्हणून अर्ज करणे
- विद्यमान संस्था बंद करून तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरू करणे
- विद्यमान संस्थेच्या साईट / लोकेशन मध्ये बदल करणे.
- महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट
- पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.
- विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) / स्तर (Level) सुरू करणे.
- विद्यमान संस्था बंद करणे
- ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात/ पत्त्यात बदल करणे

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे मान्यता प्रक्रीयेचे काम विहित मुदतीत पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या विभागातील शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षकीय वर्गाच्या सेवा उपलब्ध करुन घ्याव्यात व त्यासाठी संबंधित संस्थाप्रमुखांना आपल्या स्तरावर सबंधितांच्या सेवा आवश्यकतेप्रमाणे प्रथम प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात यावेत.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: प्रणाली व्यवस्थापक, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई.

E/Bhadekar/Approval 22-23 Notification